# ● जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
# तलाठी भरती लेखी परीक्षा-२०13

**प्र.१.** **अनौपचारिक पत्रात आई-वडिलांसमान व्यक्तींना, गुरुजनादी व्यक्तींना व ...... यांना साष्टांग नमस्कार, असा मायना लिहिण्याचा प्रघात आहे. (पहिली रिकामी जागा भरा)**
(१) तीर्थरूप (२) तीर्थस्वरूप (३) प्रिय (४) महोदय

**प्र.२.** **गटात न बसणारा शब्द ओळखा.**
(१) राऊळ (२) मंदिर (३) देवालय (४) राळ

**प्र.३.** **'रुधिर' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता?**
(१) रक्त (२) आय (३) जल (४) वसन

**प्र.४.** **दुपारच्या भोजनानंतरची अल्पशी निद्रा म्हणजे ......**
(१) भोजननिद्रा (२) साखरझोप (३) वामकुक्षी (४) शीघ्रनिद्रा

**प्र.५.** **आजानुबाहू म्हणजे काय?**
(१) ज्याचे पाय डोक्याला लागू शकतात असा.
(२) ज्याचे बाजू अत्यंत शक्तिशाली आहेत असा.
(३) ज्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब आहेत असा.
(४) बोकडाचे पाय.

**प्र.६.** **'उष्ट्या हाताने कावळा न हाकलणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय?**
(१) कोणतेही काम व्यवस्थितपणे करणे (२) एक काम करीत असताना दुसरे काम न करणे
(३) जबाबदारी दुसऱ्यावर ढकलणे (४) कधी कोणाला काहीही न देणे

**प्र.७.** **मराठी भाषेतील पहिला शिलालेख कर्नाटकात ...... या ठिकाणी श्रीगोमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो?**
(१) हंपी (२) म्हैसूर (३) श्रवणबेळगोळ (४) बेळगाव

**प्र.८.** **लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी ...... काव्यपंक्ती कुणाच्या?**
(१) सुरेश भट (२) ग्रेस (३) कुसुमाग्रज (४) माधव जूलियन

**प्र.९.** **...... आणि ...... यांना स्वरादी असे म्हणतात.**
(१) अ, आ (२) अं, अः (३) ड, त्र (४) क्, ख्

**प्र.१०.** **त्, थ्, द्, ध् ही ...... आहेत.**
(१) तालव्य वर्ण (२) कंठ्य वर्ण (३) ओष्ठ्य वर्ण (४) दंत्य वर्ण

प्र.११. दुरात्मा = ?

(१) दुर + आत्मा (२) दुर् + आत्मा (३) दुः + आत्मा (४) दु + आत्मा

प्र.१२. **'खोंड' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप काय?**

(१) भाटी (२) कालवड (३) म्हैस (४) शेळी

प्र.१३. **'चौदा भाषा' यात चौदा हा शब्द ...... आहे.**

(१) आवृत्तिवाचक संख्याविशेषण (२) गणनावाचक संख्याविशेषण

(३) क्रमवाचक संख्याविशेषण (४) अनिश्चित संख्याविशेषण

प्र.१४. **'वाटाण्याच्या अक्षता लावणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय?**

(१) एखादा धार्मिक विधी चुकीच्या पद्धतीने करणे. (२) खोटे बोलणे.

(३) स्पष्टपणे नाकारणे. (४) खोटी स्तुती करणे.

प्र.१५. **'नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे' या म्हणीचा अर्थ काय?**

(१) घरोघरी मातीच्याच चुली (२) पालथ्या घड्यावर पाणी

(३) दुभत्या गायीच्या लाथा गोड (४) नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा

**(प्रश्न १६ ते प्रश्न १८) दिलेल्या पर्यायातून शुद्ध शब्द ओळखा.**

प्र.१६. (१) उज्वल (२) उज्वल (३) ऊज्वल (४) ऊज्वल

प्र.१७. (१) दिघायुषी (२) दिर्घायूषी (३) दीर्घायुषी (४) दीर्घायूषी

प्र.१८. (१) साहीत्यिक (२) साहित्यिक (३) साहीत्यीक (४) साहित्यीक

प्र.१९. **पुढील वाक्यातील अव्ययाचा योग्य पर्याय निवडा. 'संपत्ती मिळवावी, पण परोपकार करावा.'**

(१) केवलप्रयोगी अव्यय (२) शब्दयोगी अव्यय

(३) उभयान्वयी अव्यय (४) क्रियाविशेषण अव्यय

प्र.२०. **पुढील वाक्यातील पहिल्या शब्दाची जात ओळखा. 'कोण आले होते, मला माहीत नाही.'**

(१) सामान्य सर्वनाम (२) पुरुषवाचक सर्वनाम

(३) दर्शक सर्वनाम (४) संबंधी सर्वनाम

प्र.२१. **ज्या वाक्यात सकर्मक क्रियापद आहे, ते वाक्य ओळखा.**

(१) मी पेरू खातो. (२) बाळ हसते. (३) रमेश जात आहे. (४) त्याला खवखवते.

प्र.२२. **रीती वर्तमानकाळातील वाक्य ओळखा.**

(१) मी लेखन करीत असतो. (२) मी पुस्तक वाचीत असते.

(३) मी व्यायाम केला आहे. (४) मी लेखन करीत राहीन.

प्र.२३. **पुढील शब्दाची विभक्ती ओळखा. 'रमाबाईस'**

(१) द्वितीया (२) तृतीया (३) चतुर्थी (४) पंचमी

प्र.२४. **'आजउद्या' या शब्दाचा समास ओळखा.**

(१) वैकल्पिक द्वंद्व (२) इतरेतर द्वंद (३) मध्यमपदलोपी (४) बहुव्रीही

प्र.२५. पुढील वाक्यातील अलंकार ओळखा. मनमोहिनी तुझा मोहक मोहरा मनातून माझ्या मावळेना.
(१) यमक (२) अनुप्रास (३) उत्प्रेक्षा (४) रूपक

प्र.२६. ...... Honesty is ...... best policy. (Use correct articles)
(१) the, a (२) no article, the
(३) the, the (४) no article, no article

**(Q. 27 to Q. 28) What is the meaning of following idioms / phrase.**

प्र.२७. **At the eleventh hour.**
(१) at late night (२) after inevitable has happened
(३) at the last moment (४) just before the next day

प्र.२८. **Between Scylla and Charybdis.**
(१) on a very narrow path.
(२) between two great difficulties.
(३) between one good choice and one bad choice.
(४) between two good choices.

प्र.२९. **Panacea means ......**
(१) a remedy for all diseases (२) beautiful landscape
(३) universal truth (४) very big

प्र.३०. **We congratulated him ...... his success. (Use the correct preposition)**
(१) on (२) of (३) for (४) upon

प्र.३१. **The Ganga is the longest rever in India. (Make positive)**
(१) The ganga is longer than any other river in India.
(२) The Ganga is longest of all rivers in India.
(३) No river in India is loger than the Ganga.
(४) No other river in India is as long as the Ganga.

प्र.३२. **As ...... MP Mr. Patil has done many good things for people. (Use the correct article)**
(१) a (२) an (३) the (४) no article

प्र.३३. **Which statement has correct use of punctuation marks?**
(१) No, I said, I don't want a basket. (२) No, I said, I don't want a basket.
(३) No I said I don't want a basket. (४) No I said I dont wan't a basket.

प्र.३४. **At an early age he made his <u>mark as a chemist</u>.**
**(What is the meaning of underlined words?)**
(१) made chemical mark (२) was young boy
(३) distinguished himself (४) took a firm stand

प्र.३५. **dog : bitch :: stag : ?**

(१) heifer (२) mare (३) ewe (४) doe

प्र.३६. **There is a view point high ...... the hill. (Use correct preposition)**

(१) on (२) in (३) at (४) top

प्र.३७. **'Have you - this book'? (Use proper past participle form of the verb read)**

(१) red (२) readed (३) reading (४) read

प्र.३८. **मी पत्र लिहिलेले होते. (Translate in to English)**

(१) I had written a letter. (२) I was written a letter.

(३) I had wrote a letter. (४) I had been written a letter.

प्र.३९. **Why are we here?, asked a boy to his mother. (Make indirect speech)**

(१) A boy asked his mother why they were here.

(२) A boy asked to his mother why they were there.

(३) A boy asked his mother why they were there.

(४) A boy asked to his mother why we were here.

प्र.४०. **We haven't met before, ...... (Use question tag)**

(१) haven't we? (२) have not we? (३) have we? (४) have we met?

प्र.४१. **The food was very hot. We could not eat it. (Rewrite using too)**

(१) The food was so too hot that we could not eat it.

(२) The food was too hot for us to eat.

(३) The food was so hot that we could not eat too.

(४) The food was so hot for us too eat.

प्र.४२. **We like History better than Geography. (Rewrite using prefer)**

(१) We prefer Geography to History.

(२) We prefer History to Geography.

(३) We like History being preferred to Geography.

(४) Let's prefer History to Geography.

प्र.४३. **There I saw a very old man. ( Make complex sentence)**

(१) There I saw a man who was very old.

(२) There I saw a man. He was very old.

(३) There I was seeing a man who was very old.

(४) I saw there a man and he was very old.

प्र.४४. **Madhu said to Meena, Work hard if you want to become a teacher. (Make indirect speech)**

(१) Madhu said Meena work hard if she wanted to become a teacher.

(२) Madhu told Meena to work hard if she want to become a teacher.

(३) Madhu told Meena to work hard if she was wanting to become a teacher.

(४) Madhu told Meena to work hard if she wanted to become a teacher.

प्र.४५. **Synonym of comprehend is ......**

(१) Whole (२) Understand (३) Holistic (४) Compel

प्र.४६. **Synonym of slander is ......**

(१) defamation (२) slim (३) narrow (४) reptile

प्र.४७. **Antonym of servant is ......**

(१) government (२) owner (३) master (४) peon

प्र.४८. **(Q. 48 to Q.50) identify correctly spelled words.**

(१) address (२) adress (३) addres (४) adres

प्र.४९. (१) supritendent (२) suprintendant (३) supritendant (४) superintendant

प्र.५०. (१) congretulation (२) congrejulation (३) congratulation (४) congrajulation

प्र.५१. **सिंधुदुर्ग : रत्नागिरी :: X : Y (X आणि Y च्या जागी पुढीलपैकी अनुक्रमे संभाव्य उत्तर काय?)**

(१) लातूर : उस्मानाबाद (२) उस्मानाबाद : लातूर

(३) उस्मानाबाद : सोलापूर (४) सोलापूर : उस्मानाबाद

प्र.५२. **चिमासाहेबी, अनाबेशाही, तासगाव-चमन, सोनाका या कशाचा जाती आहेत?**

(१) गहू (२) ऊस (३) कापूस (४) द्राक्षे

प्र.५३. **पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी संरक्षण साहित्य बनविणाचा कारखाना (ordnance factory) नाही?**

(१) खडकी, जि. पुणे (२) जवाहरनगर, जि. भंडारा

(३) वाडी (अंबाझरी), जि. नागपूर (४) पनवेल, जि. रायगड

प्र.५४. **माळढोक पक्षी अभयारण्य सोलापूर आणि ...... जिल्ह्यात आहे.**

(१) अहमदनगर (२) लातूर (३) विजापूर (४) सांगली

प्र.५५. **आळेफाट्यावरून कल्याणला जाताना कोणता घाट लागतो?**

(१) ताम्हिणी (२) अंबोली (३) खंडाळा (४) माळशेज

प्र.५६. **कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ कोठे आहे?**

(१) काशी (२) रामटेक (३) उज्जैन (४) मदुराई

प्र.५७. **अबोर आणि अपातनी या जमाती कोणत्या राज्यात आढळून येतात?**

(१) नागालँड (२) छत्तीसगड (३) झारखंड (४) अरुणाचल प्रदेश

**प्र.५८. भारताच्या राष्ट्रचिन्हाखाली लिहिलेले 'सत्यमेव जयते' हे वाक्य ...... मधून घेतलेले आहे.**
(१) गीता (२) वाल्मिकी रामायण (३) मंडुक उपनिषद (४) ऋग्वेद

**प्र.५९. भारताचा राष्ट्रीय प्राणी कोणता?**
(१) सिंह (२) वाघ (३) चित्ता (४) हत्ती

**प्र.६०. भारतीय नौदलाच्या (Navy) प्रमुखाला ...... म्हणतात.**
(१) जनरल (२) ॲडमिरल (३) कमोडोर (४) मार्शल

**प्र.६१. चंद्राचा फक्त ...... पृष्ठभागच पृथ्वीवरून दिसू शकतो.**
(१) ४१% (२) ४७% (३) ५१% (४) ५९%

**प्र.६२. ...... हे जगातील प्राचीन बंदरांपैकी एक होय.**
(१) लोथल (२) हडप्पा (३) कालिबंगन (४) तक्षशीला

**प्र.६३. अमरावती येथे कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी तपोवन–जगदंबा कुष्ठधामाची स्थापना कोणी केली?**
(१) बाबा आमटे (२) शिवाजीराव पटवर्धन
(३) विनोबा भावे (४) पंजाबराव देशमुख

**प्र.६४. 'गीतगोविंद' ही साहित्यकृती कोणाची?**
(१) हरिवंशराय बच्चन (२) अमृता प्रीतम (३) जयदेव (४) भवभूती

**प्र.६५. विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार ...... या साहित्यकृतीबद्दल प्रदान करण्यात आलेला आहे.**
(१) अष्टदर्शने (२) ययाती (३) स्पर्शाची पालवी (४) आकाशचा अर्थ

**प्र.६६. हॅबिअस् कॉर्पस् (बंदी प्रत्यक्षीकरण), मँडामस (परमादेश), प्रोहिबिशन (प्रतिषेध), सर्शिओररी (उत्प्रेक्षण) आणि को वॉरंटो (अधिकारपृच्छा) हे कशाचे प्रकार आहेत?**
(१) दिवाणी दावे (२) फौजदारी दावे (३) रीट (४) मूलभूत अधिकार

**प्र.६७. राष्ट्रपतींना पदावरून दूर करण्यासाठी कोणती प्रक्रिया आवश्यक आहे?**
(१) महाअभियोग (२) अविश्वास ठराव (३) विभागीय चौकशी (४) न्यायालयीन चौकशी

**प्र.६८. जेव्हा एखाद्या राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोलमडते, तेव्हा राष्ट्रपतीस (राज्यपालांच्या सल्ल्यानुसार) ...... कलमाखाली आणीबाणी जाहीर करता येते.**
(१) ३५२ (२) ३५६ (३) ३६० (४) ३६४

**प्र.६९. ग्रामपंचायत कितीही मोठी असली तरी त्यामध्ये ...... पेक्षा अधिक सदस्य असू शकत नाहीत.**
(१) १३ (२) १५ (३) १७ (४) १९

**प्र.७०. नॅशनल एड्स रिसर्च इन्स्टिट्यूट ही संस्था कोठे आहे?**
(१) देवनहळ्ळी (बंगळुरू) (२) सांताक्रुझ (मुंबई)
(३) युसुफगुडा (हैदराबाद) (४) भोसरी (पुणे)

**प्र.७१. गटात न बसणारा शब्द ओळखा.**
(१) युरोप (२) भारत (३) जपान (४) मलेशिया

प्र.७२. इंडियन बॅडमिंटन लिगमध्ये दिल्ली शहराच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या चमूचे नाव काय?
(१) दिल्ली डेअरडेव्हिल्स (२) दिल्ली शटलर्स
(३) दिल्ली स्मॅशर्स (४) दिल्ली वेव्ह राडर्स

प्र.७३. एवढ्यात प्रकाशझोतात आलेला तहरीर चौक कोणत्या खंडात आहे?
(१) आशिया (२) आफ्रिका (३) दक्षिण अमेरिका (४) युरोप

प्र.७४. ॲसिटिल सॅलिसिलिक ॲसिड (Acetylsalicylic acid)ला आणखी कोणत्या नावाने ओळखतात?
(१) ॲस्पिरिन (२) व्हिनेगर (३) पेनिसिलीन (४) कॉस्टिक सोडा

प्र.७५. भारतात राष्ट्रीय खेळ दिवस (National Sports Day) केव्हा साजरा केला जातो?
(१) २९ ऑगस्ट (२) ११ नोव्हेंबर (३) ८ मार्च (४) १७ मे

प्र.७६. एका सांकेतिक भाषेत CLIENT हा शब्द EIMZTM असा लिहिला, तर TENSION हा शब्द कसा लिहाल?
(१) UCRMVHV (२) UBSNVHV (३) VBSMVHV (४) VBRNOHV

प्र.७७. ३,५,९,१५,२३,३३ ? (प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य अंक लिहा.)
(१) ४० (२) ४२ (३) ४५ (४) ४७

प्र.७८. ३,४,५,९,१७,२६,५३,६९, ? (प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य अंक लिहा.)
(१) १३२ (२) १३३ (३) १३५ (४) १३७

प्र.७९. gfe ig eii fei gf ii (लयबद्ध मालिका पूर्ण करण्यासाठी रिकाम्या जागा भरा.)
(१) eifgi (२) figie (३) ifige (४) lfgie

(प्रश्न ८० ते प्रश्न ८३) प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल?

प्र.८०. ५६ : ५२० :: ७२ : ?
(१) ७२० (२) ७३८ (३) ७१५ (४) ७२४

प्र.८१. D8VE : C6TF :: B4RG : ?
(१) B2QT (२) A2PH (३) C4RH (४) A2HP

प्र.८२.


(१) 300 (२) 315 (३) 320 (४) 400

प्र.८३. प्रश्नार्थक चिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?

| | | |
|---|---|---|
| 230 | 60 | 110 |
| 240 | ? | 138 |
| 250 | 59 | 132 |

(१) 50 (२) 51
(३) 52 (४) 53


प्र.८४. रोहित आपल्या घरातून निघाल्यावर १५ मी. पूर्वेस गेला. तेथून त्याला कुणाल भेटला, ते दोघे त्याच दिशेने ५ मी. चालत गेल्यानंतर रोहित डाव्या बाजूला व कुणाल उजव्या बाजूला अनुक्रमे १० मी. व ७ मी. गेले. कुणाल डाव्या बाजूला ५ मी. व नंतर उजव्या बाजूला वळून २ मी. गेल्यावर ऑफिसला पोहोचला. रोहित शेवटी उजव्या बाजूला वळून ५ मी. गेल्यावर ऑफिसमध्ये पोहोचला. तर त्या दोघांच्या ऑफिसमधले अंतर किती? व शेवटी कुणाल कोणत्या दिशेला गेला?

(१) १९ मी. दक्षिण (२) १७ मी. पूर्व (३) १९ मी. उत्तर (४) १७ मी. पश्चिम

प्र.८५. रशिद पश्चिमेकडे तोंड करून उभा आहे. तो घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेने ४५ अंशातून वळला आणि पुन्हा त्याच दिशेने १८० अंशातून वळला आणि नंतर घड्याळ्याच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने २७० अंशातून वळला, तर त्याचे तोंड आता कोणत्या दिशेला आहे?


(१) दक्षिण (२) वायव्य (३) पश्चिम (४) नैर्ऋत्य

प्र.८६. खालील आकृतीत किती त्रिकोण आहेत?



(१) १६ (२) २८ (३) ३२ (४) ३८

प्र.८७. खालील आकृतीत किती आयत आहेत?



(१) १६ (२) १४ (३) १५ (४) १३

प्र.८८. २ वाजून २० मिनिटे झाली असताना घड्याळातील तासकाटा व मिनिटकाटा यांच्यामध्ये किती अंशाचा कोन असेल?

(१) ४०° (२) ५०° (३) ६०° (४) ७०°

प्र.८९. ११२६३ सेकंदाचे तास, मिनिटे व सेकंदात रूपांतर करा.

(१) ३ तास ७ मि. २३ से. (२) ३ तास ६ मि. ४३ से.
(३) २ तास ७ मि. ४३ से. (४) ३ तास ७ मि. ४३ से.

प्र.९०. शर्वरीचा जन्म शनिवार दि. ४ सप्टेंबर १९९३ ला झाला, तर तिचा तिसरा वाढदिवस ...... दिवशी येतो.

(१) बुधवार (२) गुरुवार (३) मंगळवार (४) सोमवार

प्र.९१. मेंढ्या आणि मेंढपाळांच्या एका गटामध्ये एकूण पायांची संख्या ही डोक्यांच्या संख्येच्या दुपटीपेक्षा १६ ने अधिक आहे, तर गटात मेंढ्यांची संख्या किती?

(१) ६ (२) ८ (३) २२ (४) ३५

प्र.९२. क्ष या स्थानापासून य हे ठिकाण ५०० मीटर अंतरावर आहे. क्ष पासून य पर्यंत प्रत्येक १० मीटर अंतरावर एक झाड लावावयाचे ठरल्यास एकूण किती झाडे लावता येतील?

(१) ४९ (२) ५० (३) ५१ (४) ५२

प्र.९३. ५ बगळे, ५ मासे ५ मिनिटात खातात, तर १ बगळा, १ मासा किती मिनिटात खाईल?

(१) १ मिनिट (२) $\frac{१}{५}$ मिनिट (३) ५ मिनिट (४) २५ मिनिट

प्र.९४. **A हा B पेक्षा उंच, M हा A पेक्षा उंच, G हा M पेक्षा उंच, Y हा सर्वात उंच आहे, तर उंचीच्या तुलनेत मध्यस्थानी कोण असेल?**

(१) M (२) G (३) A (४) B

प्र.९५. **५० मीटर लांबीच्या कापडातून रोज ५ मीटर कापड कापले जात असेल, तर ते कापड पूर्ण कापायला किती दिवस लागतील?**

(१) १० (२) ९ (३) ११ (४) १२

प्र.९६. **A, B, C, D, E, F हे ६ मित्र समोरासमोर बसून एका वर्तुळाकृती मैदानात खेळत आहेत. E हा D च्या डाव्या बाजूस आहे. C हा A आणि B च्या मध्ये आहे. F हा E आणि A च्या मध्ये आहे, तर F च्या डाव्या बाजूला कोण?**

(१) A (२) C (३) D (४) E


प्र.९७. **प्रत्येक तासाला घड्याळ्यात त्यावेळी जितके वाजले असतील तितके टोल पडतात, म्हणजे एक वाजता एक टोल, दोन वाजता दोन टोल याप्रमाणे, तर २४ तासांत एकूण किती टोल पडतील?**

(१) १५४ (२) १५६ (३) १५८ (४) १६०

प्र.९८. **कृष्णाने रु.९०००/- भांडवल घालून एक धंदा सुरू केला. ४ महिन्यानंतर राणीने रु.१२०००/- चे भांडवल घालून त्यात भाग घेतला. वर्षाच्या शेवटी रु.२५५०/- नफा झाल्यास राणीचा वाटा किती?**

(१) रु. १३५० (२) रु. ११७५ (३) रु. १२०० (४) रु. १२५०

**(प्रश्न ९९ व प्रश्न १००) प्रश्नांतील शब्दगट पुढीलपैकी कोणत्या व्हेन आकृतींनी दर्शविता येतो? अचूक पर्याय दर्शविणाऱ्या आकृतीखालील पर्याय उत्तरात लिहा?**




प्र.९९. **सजीव, प्राणी, हत्ती.**

(१) A (२) B (३) C (४) D

प्र.१००. **मंगळ, युरेनस, ग्रह.**

(१) A (२) B (३) C (४) D

# प्रश्नपत्रिका संग्रह - ३९ (लेखी परीक्षा उत्तरसूची) सोलापूर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (२) | २ (४) | ३ (१) | ४ (३) | ५ (३) | ६ (४) | ७ (३) | ८ (१) | ९ (२) | १० (४) |
| ११ (३) | १२ (२) | १३ (२) | १४ (३) | १५ (२) | १६ (१) | १७ (३) | १८ (२) | १९ (३) | २० (१) |
| २१ (१) | २२ (१) | २३ (३) | २४ (१) | २५ (२) | २६ (२) | २७ (३) | २८ (२) | २९ (१) | ३० (१) |
| ३१ (४) | ३२ (२) | ३३ (१) | ३४ (३) | ३५ (४) | ३६ (१) | ३७ (४) | ३८ (१) | ३९ (३) | ४० (३) |
| ४१ (२) | ४२ (१) | ४३ (१) | ४४ (४) | ४५ (२) | ४६ (१) | ४७ (३) | ४८ (१) | ४९ (४) | ५० (३) |
| ५१ (१) | ५२ (४) | ५३ (४) | ५४ (१) | ५५ (४) | ५६ (२) | ५७ (४) | ५८ (३) | ५९ (२) | ६० (२) |
| ६१ (४) | ६२ (१) | ६३ (२) | ६४ (३) | ६५ (१) | ६६ (३) | ६७ (१) | ६८ (२) | ६९ (३) | ७० (४) |
| ७१ (१) | ७२ (३) | ७३ (२) | ७४ (१) | ७५ (१) | ७६ (४) | ७७ (३) | ७८ (२) | ७९ (४) | ८० (२) |
| ८१ (२) | ८२ (२) | ८३ (२) | ८४ (१) | ८५ (४) | ८६ (४) | ८७ (३) | ८८ (२) | ८९ (४) | ९० (१) |
| ९१ (२) | ९२ (३) | ९३ (३) | ९४ (१) | ९५ (२) | ९६ (१) | ९७ (२) | ९८ (३) | ९९ (१) | १०० (४) |